**नवी मुंबई महानगरपालिका** | **Navi Mumbai Municipal Corporation**

नमुंमपा मुख्यालय, भु. क्र.१,
किल्ले गावठाणाजवळ, पामबीच जंक्शन,
सेक्टर-१५ए, सी.बी.डी. बेलापुर
नवी मुंबई - ४०० ६१४
दुरध्वनी क्रमांक : २७५६ ७१८१
फॅक्स क्र. : २७५६ ७१७५

NMMC Headquarter, Plot No.1,
Near Kille Gaonthan, Palmbeach Junction,
Sector-15A, C.B.D.Belapur
NAVI MUMBAI - 400 614
TEL.No. : 2756 7181
FAX : 2756 7175

E-Mail:- ① dmc_admin@nmmc.gov.in, ② commissioner@nmmc.gov.in

जाहिरात क्रमांक-:/ ०२ /२०२५, दिनांक:२०/०६/२०२५

## कंत्राटी पद भरतीची जाहीरात

नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये सेवानिवृत्त शासकीय/निमशासकीय अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेसाठी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.: सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३),दिनांक १० जुन, २०२५ मधील तरतुदीनुसार शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेमधील गट अ ( वेतनस्तर एस-२५ पेक्षा कमी) या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांचेकडून खालील पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | विवक्षित कामाचे स्वरुप | वय, अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | सल्लागार (कंत्राटी तत्वावर) | ०१ | नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, ऐरोली येथे विविध विषयासाठी समन्वय साधणे इ. | अ) शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेमधील गट-अ पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्ष अनुभव आवश्यक<br>आ)करार पद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.<br>इ) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.<br>अर्हता :- पदवीधर व संगणक विषयी ज्ञान आवश्यक<br>वयोमर्यादा :- ५८ ते ६५ वर्ष |

Scanned with OKEN Scanner

इच्छुक अर्जदारांनी आपले परिपुर्ण अर्ज व आवश्यक कागदपत्रांसह दिनांक ०८/०७/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता प्रशासन विभाग, ३ रा मजला, नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, भु.क्र. १, किल्ले गावठाणजवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर १५ए, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे उपस्थित रहावे.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३),दिनांक १० जुन, २०२५ नूसार अन्य नियुक्तीच्या अटी व शर्ती विनियमित करण्यात येतील

२. निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती ही १ वर्ष कालावधी करीता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने राहील.

३. करार तत्वावरील नियुक्त व्यक्तीस अर्जित, नैमित्तीक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाहीत.

४. मासिक परिश्रमिक व भत्ते :- शासकीय / निमशासकीय सेवा सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेल्या निवृत्ती वेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रक्कमेऐवढी रक्कम त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस मासिक परिश्रमिकाच्या जास्तीत जास्त २५% इतक्या मर्यादेपर्यत एकत्रित रक्कम निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता या सर्व भत्यापोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल तसेच सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी/ कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात यावी. तसेच करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

५. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल. त्यांच्या कामकाजाबाबत मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका हे वेळोवेळी आढावा घेऊन सदर कामाचे मुल्यमापन करण्यात येईल.

६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेली नसावी.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

८. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

९. यापुर्वी सेवानिवृत्तीनंतर इतर कोणत्या आस्थापनेवर काम केले असल्यास त्या आस्थापनेचा समाधानकारक काम केल्याचा दाखला.

१०. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

११. कराराचे बंधपत्र नियुक्तीनंतर स्वखर्चाने अर्जदाराने सादर करावे.

Scanned with OKEN Scanner

१२. उक्त अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी स्वत:चा पासपोर्ट साईज फोटो (२), आधारकार्ड, पॅनकार्ड आणि सोबत आवश्यक सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह सादर करणे आवश्यक राहील.

१३. कागदपत्र पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता व अनुभव प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती व स्व-साक्षांकित छायांकित (Self Attested Xerox) प्रतीसह हजर रहावे.

१४. अर्ज सादर करताना व कागदपत्रे पडताळणीसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

१५. विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास, खोटी अथवा चुकीची माहिती सादर केल्यास त्याची उमेदवारी त्याच टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. त्यामुळे अर्जामध्ये माहिती काळजीपुर्वक भरावी.

१६. अर्ज सादर केला म्हणून अथवा विहित अर्हता धारण केली म्हणून, नियुक्तीचा हक्क प्राप्त होणार नाही.

१७. मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१८. उक्त रिक्त पद नवी मुंबई महानगरपालिका नियमित आस्थापनेवरील नसून निवड करण्यात आलेल्या अर्जदारास सदर आस्थापनेवर नियमित करून घेण्याचा हक्क मागता येणार नाही.

१९. उक्त पदाकरीता अर्जदारांची अर्ज नोंदणी झाल्यानंतर मूळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल. तसेच शक्य झाल्यास त्याच दिवशी मुलाखत घेण्यात येईल. याची कृपया सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

ठिकाण :- सीबीडी बेलापूर, नवी मुंबई
दिनांक :-२० / ०६ /२०२५

**( डॉ.कैलास शिंदे )**
**आयुक्त**
**नवी मुंबई महानगरपालिका**

Scanned with OKEN Scanner

# नवी मुंबई महानगरपालिका

## नमुंमपा मुख्यालय,भुखंड क्र.१,पामबीच जंक्शन, सेक्टर १५ए,सीबीडी बेलापुर,नवी मुंबई ४००६१५

पासपोर्ट साईज फोटो

**गट - अ या संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी करार पध्दतीने विवक्षित कामासाठी अर्ज**

(जाहिरात क्रमांक:०२/२०२५,दि.२०/०६/२०२५

**(कृपया अर्जदाराने अर्जातील माहिती अचुकपणे भरावी, खाडाखोड केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत)**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १.अर्जदाराचे पूर्ण नाव ( प्रथम आडनाव) | आडनाव | | नाव | | वडिलांचे / पतीचे नाव | |
| | ………………………………………………………………………………………… | | | | | |
| २.जन्म दिनांक | दिनांक | | महिना | | वर्ष | |
| | ………………………………………………………………………………………… | | | | | |
| ३. दि.०१ /०६/२०२५ रोजीचे वय | ……………… वर्ष ……………. महिने ……………. दिवस | | | | | |
| ४. लिंग (✓) | पुरष | | स्त्री | | इतर | |
| ५. वैवाहिक स्थिती (✓) | विवाहीत | | अविवाहित | | | |
| ६.अर्जदाराचा कायम पत्ता | ………………………………………………………………………………………… ………………………………………………………………………………………… | | | | | |
| ७.सध्याचा राहण्याचा/ पत्रव्यवहाराचा पत्ता | ………………………………………………………………………………………… ………………………………………………………………………………………… | | | | | |
| ८. अर्जदाराचा मो. नं. ई-मेल (कॅपीटल अक्षरामध्ये) | ……………………………………………………………………………… | | | | | |
| ९. मराठी भाषेचे ज्ञान आहे काय (✓) | आहे | | | नाही | | |
| १०. पॅन क्रमांक | | | | | | |
| ११. आधार क्रमांक | | | | | | |
| १२. सेवानिवृत्तीचा दिनांक | दिनांक / / | | | | | |
| १३. सेवानिवृत्ती पीपीओ (PPO) क्रमांक/सेवानिवृत्ती आदेश जावक क्रमांक व दिनांक | | | | | | |
| १४. सेवानिवृत्ती वेतन घेत असलेल्या बँकेचे नाव व खाते क्रमांक | बँकेचे नाव व शाखेचा तपशील :- | | | | | |
| | खाते क्रमांक :- | | | | | |

१५.शैक्षणिक अर्हतेचा तपशील .

| अर्हता | बोर्ड/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| एस.एस.सी. | | | | | | |
| एच.एस.सी. | | | | | | |
| पदवी | | | | | | |
| एम.एस.सी.आय.टी. / इतर संगणक अर्हता | | | | | | |
| इतर अर्हता | | | | | | |

**१६. शासकीय सेवेचा तपशील**

| अ. क्र. | पदनाम व वर्ग | पदावरील सेवेचा कालावधी | सेवा कालावधीत मिळालेल्या शासकीय पारितोषिकांचा तपशील | सेवा कालावधीत कोणतीही शिस्तभंग विषयक कार्यवाही झाली असल्यास त्याचा तपशील, नसल्यास सेवा निवृत्ती वेळेस कार्यालयाने दिलेल्या निरंक प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी./ सेवानिवृत्ती आदेशाची प्रत जोडावी |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**१७. सेवानिवृत्ती वेळेसचा तपशील :-**

| अ. क्र. | पदनाम | कार्यालयाचे नाव | वेतनश्रेणी | सेवानिवृत्तीच्या दिनांकास मूळ वेतन ग्रेड पे सह | अंशराशीकरण वजा करुन मंजूर झालेले मूळ सेवानिवृत्ती वेतन | मंजूर सेवानिवृत्ती वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमुद संपूर्ण माहिती सत्य व अचुक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहितीपैकी कोणतीही माहिती असत्य / चुकीची असल्याचे निर्देशनास आल्यास माझी निवड / नियुक्ती कोणतीही पुर्व सूचना न देता रद्द करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कार्यवाही होऊ शकते, याची मला पुर्ण जाणीव आहे.

कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरुपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणाधिकार / हक्क निर्माण होत नाही. मी नमूद केलेल्या अर्हता विषयक तपशीलाच्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास सादर करण्याची हमी मी याद्वारे देत आहे.

**दिनांकित स्वाक्षरी** :-

**अर्जदाराचे पुर्ण नाव** :- -------------------------------------

**(कार्यालयीन वापराकरीता)**

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जदार विहीत केलेली अर्हता धारण करत आहे काय? | **होय / नाही** |

अर्जदाराच्या कागदपत्रांची पडताळणी करणाऱ्याची स्वाक्षरी

**वरिष्ठ लिपीक / लिपीकाचे नाव व स्वाक्षरी** **प्रशा. अधिकारी/अधिक्षकाचे नाव व स्वाक्षरी**

**मुलाखत घेणा-या पथक प्रमुखाचा शेरा**

सदर अर्जदार नवी मुंबई महानगरपालिकेतील कंत्राटी सेवेसाठी **पात्र / अपात्र**

**शेरा :-** ---------------------------------------------------------------------------

-------------------------------------

**अधिका-याचे नाव व स्वाक्षरी**